# बी.ए – चवथे सेम (राज्याचे शासन आणि राजकारण)

## प्रकरण तीन – मुख्यमंत्री आणि उच्च न्यायालय

मुख्यमंत्री – केंद्रीय शासनाप्रमाणे घटक राज्यात देखील संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. संसदीय शासनपद्धतीत वास्तविक शासक म्हणून मुख्यमंत्र्याचे स्थान महत्वाचे आहे. भारतीय संविधानाच्या कलम १६३ नुसार ‘राज्यपालाने स्व:विवेकाने करावयाची कार्य सोडून त्याच्या इतर कार्यात मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्याच्या नेतृत्वाखाली एक मंत्रीमंडळ राहील’. केंद्रामध्ये जे स्थान पंतप्रधानाचे आहे तेच स्थान घटक राज्यात मुख्यमंत्र्याचे आहे. विधानसभेतील बहुमत प्राप्त पक्षाच्या पुढाऱ्याला राज्यपाल मुख्यमंत्री नेमतो. परंतु विधानपरिषदेतील सदस्याला विधासभेतील बहुमताचा पाठिंबा असेल तर त्यालाही मुख्यमंत्री नेमता येते.

नियुक्ती – मुख्यमंत्र्याची नियुक्ती राज्यपाल करेल व मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने राज्यपाल इतर मंत्र्याची नियुक्ती करेल अशी तरतूद संविधानात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री हा विधिमंडळाचा सदस्य असला पाहिजे. जर नसेल तर सहा महिन्याच्या आत त्याने विधिमंडळाचे सदस्यत्व प्राप्त केले पाहिजे.

कार्यकाल – विधानसभेचा विश्वास असल्यास मुख्यमंत्री जास्तीतजास्त ५ वर्षापर्यंत आपल्या अधिकार पदावर राहतो. त्याचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी तो स्वेच्छेने राजीनामा देवू शकतो. मुख्यमंत्री व त्याचे मंत्रीमंडळ यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मंजूर केल्यास मुख्यमंत्र्याला आपले पद सोडावे लागते.

मुख्यमंत्र्याचे अधिकार व कार्य – मुख्यमंत्र्याच्या अधिकार व कार्याचा उल्लेख भारतीय संविधानात करण्यात आला नाही. मुख्यमंत्री हा वास्तविक शासक असल्यामुळे राज्यपालाला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर मुख्यमंतत्री व मंत्रीमंडळ करीत असते. मुख्यमंत्र्याचे अधिकार व कार्य पुढील प्रमाणे आहेत.

१.मंत्रिमंडळाचा निर्माता २.खातेवाटप ३.मंत्रीमंडळाचा अध्यक्ष ४.विधानसभेचा नेता ५.मंत्रीमंडळ आणि राज्यपाल यांच्यातील दुवा ६.नियुक्तीसंबधी अधिकार ७.निवडणुकीचा केंद्रबिंदू ८.प्रसिद्धीचा केंद्रबिंदू

उच्च न्यायालय –

भारतीय संविधानाच्या कलम २१४ नुसार प्रत्येक घटक राज्यात एक उच्च न्यायालय राहील अशी तरतूद करण्यात आली आहे. भारताने संघराज्य शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. परंतु न्यायव्यवस्था एकात्म स्वरुपाची ठेवण्यात आली आहे. उच्च न्यायालय हे सर्वोच्च न्यायालयाप्रमाणे अभिलेख

न्यायालय आहे. राज्यातील दुय्यम न्यायालये उच्च न्यायालयाच्या अशीन असतात आणि उच्च न्यायालयांनी दिलेले निर्णय दुय्यमय न्यायालयावर बंधनकारक असून उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध जातील असा निकाल दुय्यम न्यायालये देवू शकत नाहीत. दुय्यम न्यायालयांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करता येते. तसेच उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायलयात जाता येते. त्यामुळे एकात्म न्यायव्यवस्था हे भारतीय संघराज्यातील न्यायव्यवस्थेचे वैशिष्टे ठरले आहे.

## उच्च न्यायालयाची रचना

१.न्यायाधीशांची संख्या – भारतीय संविधानाच्या कलम २१६ नुसार प्रत्येक उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपती ठरवेल तेवढे इतर न्यायाधीश असतात. साधारणत: न्यायाधीशांची संख्या ठरविताना त्या राज्याची लोकसंख्या, विस्तार पहिले जाते. त्यामुळे प्रत्येक घटक राज्यातील न्यायधीशांची संख्या वेगवेगळी असते.

२. न्यायधीशांची नियुक्ती – उच्च न्यायालयाच्या न्यायधीशांची नियुक्ती राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायधीशांच्या सल्ल्याने करतो. इतर न्यायधीशांची नियुक्ती राष्ट्रपती स्व:ताच्या सही-शिक्यानिशी करीत असतो. पण ही नियुक्ती करतांना सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशासोबतच उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचा सल्ला घ्यावा लागतो.

३.न्यायाधीशांची पात्रता – १. तो भारताचा नागरिक असला पाहिजे. २. त्याने न्यायाधीश म्हणून कमीत कमी १० वर्ष काम केलेले असावे.

४. न्यायाधीशांचा कार्यकाल – भारतीय संविधानाने न्यायाधीशांचा कार्यकाल ठरवून दिलेला नाही. परंतु त्याचे सेवानिवृत्तीचे वय ठरविण्यात आले आहे. उच्च न्यायालयाचा न्यायधीश वयाची ६२ वर्ष पूर्ण होईपर्यंत आपल्या पदावर राहू शकतो. कार्यकाल संपण्यापूर्वी तो स्वेच्छेने आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रपतीकडे पाठवू शकतो. तसेच त्यांना पदावरून दूर करण्यासाठी महाभियोग प्रक्रिया चालविण्यात येते.

५. न्यायाधीशांचे वेतन व भत्ते – संसद कायद्याद्वारे ठरविल तेवढे वेतन व भत्ते त्यांना दिले जातात. सद्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाला दरमहा ४०,००० रुपये आणि इतर न्यायाधीशांना ३५.००० रुपये वेतन दिले जाते. शिवाय इतर सोयी सुविधा दिल्या जातात. त्याचे वेतन भारताच्या संचित निधी मधून दिले जाते.

उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र –

१.प्रादेशिक अधिकार क्षेत्र – उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र घटक राज्यापुरतेच मर्यादित असते. संसद कायदा करून उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र वाढवू शकते.

२.प्रारंभिक अधिकार क्षेत्र – ज्या खटल्याची सुरवात सरळ उच्च न्यायालयात होते तेथे दुय्यम न्यायालयामध्ये त्यांची सुरवात होऊ शकत नाही. त्याला प्रारंभिक अधिकार क्षेत्र असे म्हणतात. याअंतर्गत (अ) दिवाणी दाव्यासंबधी (ब) मुलभूत अधिकारासंबधी (क) कायद्याच्या वैधतेसंबधी (ड)निवडणूक याचिकेसंबधी इत्यादी खटले चालविले जातात.

३.पुर्ननिर्णयाचे अधिकार क्षेत्र – उच्च न्यायालय हे घटक राज्यातील पुर्ननिर्णयाचे सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे.

४. इतर अधिकार – (अ) इतर कनिष्ट न्यायालयांनी कोणते कार्य करावे, कामकाज व कागदपत्रे, नियम याविषयी (ब) हे अभिलेख न्यायलय असल्यामुळे शंका घेवू नये. (क) कनिष्ट न्यायालयावर देखरेख (ड) इतर न्यायालयातील साधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणुका उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश करतो त्यांच्या अटी व सेवा-शर्ती ठरविण्याचा अधिकार

## प्रकरण – चवथे – पंचायत राज आणि माहितीचा अधिकार

पंचायत राज – भारतीय संविधानात ७३ वी घटना दुरुस्ती १९९३ साली करण्यात आली. स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने ते महत्वाचे पाऊल ठरले आहे. ७३ वी घटना दुरुस्तीने ‘पंचायती’ या शिफारशीखाली ‘भाग ९ अ’ हा नवीन भाग राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामध्ये २४३ ते २४३ ओ’ अशी कलमे आहेत. याशिवाय या दुरुस्तीनुसार राज्यघटनेला अकरावे परिशिष्ट जोडले असून त्यामध्ये पंचायत राज्यसंस्थेच्या अधिकार कक्षेत येणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे.

७३ व्या घटना दुरुस्तीनुसार ग्रामपंचायतीत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती जमातीना आरक्षित जागा ठेवण्याची तरतूद अत्यंत महत्वाची आहे. या घटना दुरुस्तीनुसार पंचायत राज संस्थाच्या संदर्भात निरनिराळे कायदे निर्माण करण्याचे काम राज्य विधी मंडळाला देण्यात आला तसेच राज्य सरकार आणि पंचायत राज संस्था यांच्यात योग्य समतोल साधण्याचे कार्य या घटना दुरुस्तीने केले आहे. यामध्ये स्थानिक स्वशासन (ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका) इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार त्यांची रचना, कार्यकाल, पदाधिकारी, त्यांची कार्य इत्यादी विषयी महत्वपूर्ण माहिती सांगितली आहे.

माहितीचा अधिकार – लॅटीन भाषेतील (Information) किंवा (Form) या शब्दापासून 'माहिती' हा शब्द बनला आहे. त्याचा अर्थ देणे किंवा प्रारूप बनविणे असा घेतला जातो. आजचे युग विज्ञानाचे आहे त्यामुळे माहिती आणि तंत्रज्ञानाला जास्त महत्व प्राप्त झाले आहे. प्रशासकीय क्षेत्रात अधिक पारदर्शकता यावी म्हणून या अधिकाराला महत्व प्राप्त झाले आहे. अनेक राज्यांनी आपापल्या राज्यात माहितीचा अधिकार लागू केला आहे. देशातील जनतेला कोणतीही माहिती प्रभावीरीत्या प्राप्त व्हावी या दृष्टीने भारतीय संसदेने ११ मे २००५ मध्ये माहितीचा अधिकार अधिनियम मंजूर करून हा कायदा संपूर्ण देशात लागू केला.

माहितीच्या अधिकाराचे महत्व – १. सुशानाची निर्मिती २. ई- गव्हर्नरची स्थापना ३. सामाजिक कल्याण ४.व्यक्तीच्या स्वातंत्र्याशी संबधीत ५.घटनात्मक अधिकार ६.जनतेच्या हिताकरिता ७.प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ ८.जनतेत जागृती ९.कर्मचाऱ्याची प्रतिमा उंचावणे १०.सर्वसामान्य जनतेचे समाधान १२.लोकशाही मुल्यांची स्थापना १३. जनता व प्रशासन यांच्यात सलोखा इत्यादी मुद्यांच्या आधारे माहितीच्या अधिकाराचे महत्व विशद करता येते.

---

## सरावाकरिता प्रश्न

### वस्तुनिष्ठ प्रश्न – रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.

१. भारतीय संविधानात ................ सूचीचा समावेश करण्यात आला आहे. (दोन, चार, तीन, पाच)

२. राज्यात केंद्राचा प्रतिनिधी म्हणून ...................... काम बघतो. (मुख्यमंत्री, राज्यपाल, पंतप्रधान)

३. भारतीय राज्यघटनेनुसार ........... कलमानुसार प्रत्येक घटक राज्यात एक विधानसभा असते. (१७०, १६९, ३६५, २५३)

४. मंत्रीमंडळ आणि राज्यपाल यांच्यातील .............. दुवा म्हणून कार्य करीत असतो. (पंतप्रधान, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री)

५.भारतीय संविधानाच्या कलम ......... नुसार प्रत्येक घटक राज्यात एक उच्च न्यायालय राहील अशी तरतूद करण्यात आली आहे. (२१४, २१६, १६९, १७०)

६. ...... व्या घटना दुरुस्तीनुसार पंचायत राज्याची स्थापना करण्यात आली आहे. (७३, ७५, ७७, ७८)

७. भारतीय संसदेने ............ मध्ये माहिती अधिकार अधिनियम मंजूर करून हा कायदा संपूर्ण देशात लागू केला. (११ मे २००५, ११ एप्रिल २००५, ११ मे २००६, ११ मे २००४)

### दीर्घोत्तरी प्रश्न

१. केंद्र व राज्याचे विधीविषयक, प्रशासकीय व आर्थिक संबध स्पष्ट करा.

२. विधानसभेची रचना, अधिकार आणि कार्य सांगा.

३. मुख्यमंत्र्याचे अधिकार, कार्य आणि भूमिका सांगा.
४. उच्च न्यायालयाची रचना सांगा.

### लघुत्तरी प्रश्न

१. राज्यपालाचे अधिकार
२. विधानपरिषदेची कार्य
३. उच्च न्यायालयाचे अधिकार क्षेत्र
४. ७३ व्या घटना दुरुस्तीचे महत्व
५. माहितीच्या अधिकाराचे महत्व

---

### संदर्भ -

भारतीय शासन आणि राजकारण व राज्याचे शासन आणि राजकारण – प्रा.डॉ,विमल राठोड – अंशुल पब्लिकेशन नागपूर – प्रथम आवृत्ती २०१७ – ISBN NO.987-81-931789-6-6